-६०९- -७०७- -563-

**अपंग कर्मचारी/अधिकारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणेबाबत**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:सीएफआर-१२०६/प्र.क्र.६०/०६/१३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १२ डिसेंबर, २००६

वाचा: १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२६९/ड-१, दिनांक ४/८/१९६९

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२८०/१३, दिनांक २२/१२/१९८०

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१०८९/५२२/प्र.क्र.६१/८९/१३, दिनांक २/८/१९८९

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२९५/प्र.क्र.३६/१३, दिनांक १/२/१९९६

प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांच्या कामाचे सत्य व वस्तुनिष्ठ मूल्यमापन गोपनीय अहवालात करावे असे निदेश संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ४/८/१९६९ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आले होते. या निदेशांचे काटेकोर पालन करावे असे संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक २२/१२/१९८० च्या परिपत्रकान्वये सर्वांना सूचित केले होते.

संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २/८/१९८९ अन्वये प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी त्यांच्या हाताखालील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे गोपनीय अभिलेख हेतुपुरस्सरपणे, नकारात्मक दृष्टीने किंवा जाणूनबुजून प्रतिकूल स्वरूपात न लिहिता अत्यंत वस्तुनिष्ठ लिहावेत असे निदेशित करण्यात आले होते. अशाच स्वरुपाच्या सूचनांचा पुनरुच्चार संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक १/२/१९९६ च्या शासन निर्णयाद्वारेही करण्यात आली आहे. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत शासनाने दिलेले वरील निदेश अपंग कर्मचाऱ्यांकरितादेखील लागू करावेत अशी मागणी शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन आता खालीलप्रमाणे निदेश देत आहे:-

## निर्णय

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - ईएस
आवक नं. - ९
28 MAR 2007
विशेष नोंद वहीत
कार्यविवरण नं.
निवासी / उपजिल्हाधिकारी

वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल वस्तुनिष्ठ लिहिण्याबाबत तसेच ते हेतुपुरस्सरपणे, नकारात्मक दृष्टीने किंवा जाणूनबुजून प्रतिकूल स्वरूपात न लिहिण्याबाबत सध्या प्रचलित असलेले संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक १/२/१९९६ च्या शासन निर्णयातील निदेश अपंग कर्मचारी/अधिकारी यांचेकरिताही लागू करावेत असा शासनाने निर्णय घेतला आहे.

कृ.मा.प.

सर्व प्रशासकीय मंत्रालयीन विभाग तसेच विभागप्रमुखांनी सदर शासन निर्णयातील निदेश त्यांच्या नियंत्रणाखालील विविध स्तरावरील सर्व प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि या निदेशाचे काटेकोर पालन होत असल्याची खात्री करून घ्यावी. सदर आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द (प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकाऱ्यांविरुध्द) उचित अशी कार्यवाही करावी असेही निर्देशित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र.कृ.लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,